# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः29.06.2026** **वारःसोमवार**

---

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासातील नेतृत्वासाठी सेशेल्सचा सर्वोच्च सन्मान 'गार्डियन ऑफ द ब्लू होरायझन' प्रदान
- हिंद प्रशांत क्षेत्राला संधी, विकास आणि सुरक्षिततेचा महासागर बनवण्याचं उद्दिष्ट्य–पंतप्रधानांचं प्रतिपादन
- देशभरात आजपासून माता आणि बालकांच्या आरोग्य सेवा अधिक बळकट करण्यासाठी 'समग्र शिशु बाल स्वास्थ्य कार्यक्रम आणि
- पश्चिम बंगालचा काही भाग आणि सिक्कीममध्ये अति मुसळधार पावसाचा हवामान विभागाचा इशारा.

**<u>पंतप्रधान</u>**

पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासातील नेतृत्वासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सेशेल्सचा सर्वोच्च सन्मान 'गार्डियन ऑफ द ब्लू होरायझन' प्रदान करण्यात आला. सेशेल्सचे राष्ट्रपती पॅट्रिक हर्मिनी यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार मिळाल्यानंतर पंतप्रधान मोदींनी सेशेल्सच्या जनतेचे आणि सरकारचे आभार मानले. पर्यावरण संवर्धन ही भावी पिढ्यांप्रति आपली जबाबदारी असल्याचं त्यांनी यावेळी बोलताना सांगितलं. त्यांनी हा पुरस्कार हवामान बदलाच्या आव्हानाविरुद्ध लढणाऱ्या राष्ट्रांना समर्पित केला.

हिंद प्रशांत क्षेत्राला संधी, विकास आणि सुरक्षिततेचा महासागर बनवण्याचं उद्दिष्ट असल्याचं प्रतिपादन मोदी यांनी काल सेशेल्समधील व्हिक्टोरिया इथं केलं, सेशेल्सचे राष्ट्राध्यक्ष पॅट्रिक हर्मिनी यांच्याबरोबर झालेल्या शिष्टमंडळस्तरीय चर्चेनंतर भारताची भुमिका मांडताना ते बोलत होते. दोनही देशातील उद्योगांसाठी नव्या संधी शोधल्या जातील आणि व्यापार आणि गुंतवणूकीला चालना देण्यासाठी प्रयत्न केले जातील अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. भारताची युपीआय पेमेंट प्रणाली सेशेल्समध्ये सुरु करण्याबाबत यावेळी सामंजस्य करार करण्यात आला. पंतप्रधान मोदी सेशेल्सच्या 50 व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित राष्ट्रीय दिन सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून सहभागी झाले. भारतीय नौदलाच्या बँडचाही या संचलनातील पथकात समावेश होता. सेशेल्ससोबतच्या भारताच्या दीर्घकालीन मैत्रीचे दर्शन घडवत, 'आयएनएस तरकश' आणि 'आयएनएस इक्षक' ही जहाजं' पोर्ट व्हिक्टोरिया' इथं तैनात करण्यात आली होती.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल सेशेल्समध्ये मॉरिशसचे पंतप्रधान डॉ. नवीनचंद्र रामगुलाम यांची भेट घेतली. या दोन्ही नेत्यांनी भारत आणि मॉरिशस यांच्यातील सुरू असलेल्या सहकार्याबाबत चर्चा केली. तसंच, भारतानं जाहीर केलेल्या विशेष आर्थिक मदतीच्या अंमलबजावणीत झालेल्या प्रगतीचा आढावा घेतला.
भारत आणि मॉरिशसदरम्यान सुरू असलेले द्विपक्षीय प्रकल्प मॉरिशसची आरोग्यसेवा, संपर्क व्यवस्था, शाश्वत विकास आणि सागरी अर्थव्यवस्थायामध्ये योगदान देतील. भारताचे 'व्हिजन महासागर' आणि 'शेजारी प्रथम'

याधोरणाअंतर्गत भागीदारी'चे महत्त्व, तसेच 'ग्लोबल साउथ' प्रति असलेली सामायिक कटिबद्धता यांवर दोन्ही पंतप्रधानांनी सहमती दर्शवली.

**<u>मनकीबात</u>**

राष्ट्र उभारणीतली लोकसहभागाची ताकद, ही भारताची सर्वात मोठी संपत्ती आहे आणि याचा प्रत्यय आपण पुन्हा पुन्हा घेत आहोत, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. आकाशवाणीवरील मन की बात या कार्यक्रमाच्या एकशे पस्तीसाव्या भागात ते काल बोलत होते. पश्चिम आशियातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर, देशवासियांना आपण केलेल्या आवाहनाला मोठा प्रतिसाद मिळाल्याचं त्यांनी सांगितलं. त्याबद्दल नागरिकांचे त्यांनी आभारही मानले. मन की बातच्या कालच्या भागात आत्मनिर्भर भारत, संरक्षण क्षेत्रातील स्वदेशी सामर्थ्य आणि वैज्ञानिक दृष्टिकोन, भारतीय संस्कृती यांसह विविध मुद्दयांवर पंतप्रधानांनी भाष्य केलं.

जगभरात आंतरराष्ट्रीय योग दिन अत्यंत उत्साहात साजरा झाला; त्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं. अहमदाबाद इथं झालेल्या जागतिक योगासन स्पर्धेत भारतानं 102 सुवर्ण पदकांसह 114 पदकं जिंकल्याबद्दल त्यांनी विजयी खेळाडूंचं अभिनंदनही केलं.

आगामी गणेशोत्सवात प्लास्टर ऑफ पॅरिसपासून बनवलेल्या गणेश मूर्ती खरेदी करू नयेत; त्या ऐवजी स्थानिक मूर्तिकारांनी तयार केलेल्या मूर्ती खरेदी करून व्होकल फॉर लोकलचा संकल्प अधिक दृढ करावा असं आवाहनही त्यांनी केलं.

आपला कौटुंबिक आनंद सोहळा साजरा करताना, सामाजिक भान जपणाऱ्या नांदेडच्या बहादूरपुरा गावातल्या पेटकर कुटुंबाचं उदाहरण काल पंतप्रधानांनी मन की बात मधून दिलं.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या या उपक्रमाची मन की बातमध्ये दखल घेतल्याबद्दल अनुप पेटकर यांनी आनंद झाल्याची भावना आकाशवाणीकडे व्यक्त केली आहे..

मी मागील काही वर्षांपासून इन्शुरन्स चे काम करत असतो. काम करत असताना अपघाताचे प्रमाण बऱ्याच ठिकाणी लक्षात आले. त्याच हेतूने मी माझ्या स्वतःच्या लग्नात जवळपास हजार बाराशे च्या वर हेल्मेट वाटप केलेत आणि कोरोनाच्या काळामध्ये मी माझ्या फर्म तर्फे मास्कचे वाटप केले. त्याच्यानंतर आता गेल्या आठवड्यात माझ्या छोट्या भावाचं लग्न झालं लग्नामध्ये असं लक्षात आलं की हेल्मेट आपण दिले. पण गावासाठी आपण काही केलं नाही. त्या हेतूने पूर्ण गावाचा आम्ही इन्शुरन्स केला. आणि त्याच गोष्टीची आज दखल आणि माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब यांनी त्या गोष्टीची आज दखल घेतली त्याबाबतीत आमच्या परिवाराच्या इतका आनंद आज कोणालाही झाला नाही. त्यामुळे नरेंद्र मोदी साहेबांचे आभार.

**<u>हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरुन ऐकत आहात</u>**

**<u>नड्डा</u>**

देशभरातील माता आणि बालकांच्या आरोग्य सेवा अधिक बळकट करण्यासाठी 'समग्र शिशु बाल स्वास्थ्य कार्यक्रमाची सुरुवात आज आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जगत प्रकाश नड्डा यांच्या हस्ते नवी दिल्ली इथं होणार आहे. अशी माहिती आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं दिली आहे. जन्मापासून ते तीन वर्षांपर्यंतच्या मुलांसाठी एकात्मिक गृह-आधारित आणि समुदाय-आधारित आरोग्य सेवा प्रदान करण्याच्या उद्देशानं हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. विशेष काळजीची घेण्याची गरज असलेल्या मुलांसाठी 'जोखीम-आधारित पाठपुरावा प्रणाली' सुरू केली जाणार आहे.

**पियुष-गोयल**

व्यापार, गुंतवणूक आणि धोरणात्मक आर्थिक सहकार्य अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने उच्च-स्तरीय भारतीय व्यावसायिक शिष्टमंडळ ग्रीसमधील अथेन्सच्या दौऱ्यावर जात आहे. व्यापार आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांच्या नेतृत्वाखाली युनायटेड किंगडमचा दौरा आटोपल्यानंतर, ही भेट नियोजित आहे. ग्रीस दौऱ्यादरम्यान हे शिष्टमंडळ 'द अथेन्स स्टार्टअप बिझनेस इनक्युबेटर' इथं आयोजित स्टार्टअप परिषदेत सहभागी होतील, असं व्यापार आणि उद्योग मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनांत म्हटलं आहे.

**अमेरिका**

अमेरिका आणि इराण यांनी प्रतिहल्ले थांबवून उद्या कतारची राजधानी दोहा इथं चर्चा पुन्हा सुरू करण्यास सहमती दर्शवली आहे. गेल्या काही दिवसांपासून इराण आणि अमेरिकेदरम्यान सुरू असलेल्या लष्करी तणावामुळे युद्धविरामासाठीच्या वाटाघाटी यशस्वी होऊ शकल्या नाही, होर्मुझच्या सामुद्रधुनीवरील वाद सोडवण्याच्या उद्देशाने हे पाऊल उचलण्यात आलं आहे.

**ठाणे**

महाराष्ट्रात शिक्षक पात्रता परिक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्या प्रकरणी तीनही आरोपींना काल भिवंडी सत्र न्यायालयानं 6 जुलैपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. या प्रकरणात आंतरराज्यीय आणि राष्ट्रीय टोळी कार्यरत असल्याचा संशय आहे. आणखी दोन आरोपी फरार असल्याची माहिती पोलिस तपासात समोर आली आहे. आरोपींनी कथितरीत्या दिल्लीहून भिवंडीला येऊन हा फुटलेला प्रश्नसंच 1 कोटी 50 लाख रुपयांना विकण्याचा प्रयत्न केला होता असं भिवंडी पोलिसांनी न्यायालयाला सांगितलं.

**पुरी**

ओडिशामधील पुरी या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी आज सकाळीपासून पौर्णिमेनिमित्त लाखो भाविकांनी गर्दी केली आहे. भगवान जगन्नाथ, भगवान बलभद्र आणि देवी सुभद्रा यांचा पवित्र 'देव स्नान यात्रा' हा विधीवत स्नान सोहळा श्री जगन्नाथ मंदिरात पारंपरिक पध्दतीनं साजरा होत आहे. 'देव स्नान पौर्णिमे'च्या शुभ प्रसंगी होणारा हा वार्षिक विधी, जगप्रसिद्ध 'रथ यात्रे'ची एक महत्त्वाची पूर्वतयारी मानला जातो. या स्नान सोहळ्यानंतर देवता 'अनसर' या पंधरवड्याच्या कालावधीत प्रवेश करतील; या काळात मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी खुलं केलं जात नाही. हा उत्सव सुरळीतपणे पार पाडण्यासाठी कडक सुरक्षा आणि गर्दी नियंत्रणाचे व्यापक नियोजन करण्यात आले आहे.

**हवामान**

भारतीय हवामान विभागानं आज उप-हिमालयीन पश्चिम बंगाल आणि सिक्कीममध्ये अति मुसळधार ते अत्यंत मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. तसंच, पुढील दोन ते तीन दिवसांत गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगड, झारखंड, बिहार, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडच्या काही भागांत नैऋत्य मोसमी वाऱ्यांची आगेकूच होण्यासाठी अनुकूल परिस्थिती असल्याचेही हवामान विभागानं म्हटले आहे. इकडे महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये जोराचे वारे आणि वीजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. महाराष्ट्राच्या विविध भागात काल पावसानं कमी अधिक प्रमाणात हजेरी लावली. अहिल्यानगर, रत्नागिरी कोल्हापूर लातूर, सोलापूर आणि अकोला या जिल्ह्यांमध्ये अनेक दिवसांच्या प्रतिक्षेनंतर पावसाने काल हजेरी लावली.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**